RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक–कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक १७(४)] बुधवार, मार्च ११, २०२६/फाल्गुन २०, शके १९४७ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक २६

प्राधिकृत प्रकाशन

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. ७, मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडून

प्रतापगड को. ऑ.हौ.सो., विनायक अपार्टमेंट, पहिला मजला, हाफकिन इन्स्टिट्यूटसमोर, परेल व्हिलेज, मुंबई ४०० ०१२.

अधिसूचना

क्रमांक उपजिभूक्र.७/भूसं/मुंउजि/एलएक्यू-८६३/२०२४.—ज्याअर्थी, बृहन्मुंबई महानगरपालिकेचा विकास आराखडा - २०३४(यापुढे " उक्त विकास आराखडा-२०३४ " म्हणून संबोधिलेला) शासनाच्या नगर विकास विभागाची अधिसूचना क्रमांक टीपीबी/४३१७ /६२९ /प्र.क्र.११८ /२०१७ /वि.यो./नवि-११, दिनांक ८ मे २०१८ **महाराष्ट्र शासन राजपत्र**, भाग एक- कोकण विभागीय पुरवणी गुरुवार ते बुधवार, मे १७-२३, २०१८ मध्ये प्रसिद्ध करण्यात आली असून त्याअन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३१ पोट-नियम (१) अन्वये (यापुढे "उक्त महाराष्ट्र अधिनियम" म्हणून संबोधिलेला) मंजूर केली असून अधिसूचनेच्या दिनांकापासून अंमलात आलेली आहे ;

ज्याअर्थी, सोबतच्या **अनुसूची-१** मध्ये नमूद केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे.) उक्त विकास आराखडा-२०३४ मधील नियम क्र.५५ मध्ये "मेट्रो / मोनो कोस्टल रोड एलिवेटेड कॉरिडोरमध्ये येणारे कोणतीही सरेखन बदल व सुधारित योजनेनुसार स्वयंचलनाने विकास आराखड्यात सुधारित केल्या जातील अशी तरतूद असल्याने, " मुंबई मेट्रो प्रकल्प-**२ब** या प्रकल्पातील सारस्वत स्थानकात जा-ये करणेकरिता" या प्रयोजनासाठी स्वयंचलनाने आरक्षित होत आहेत. (यापुढे " उक्त सार्वजनिक प्रयोजन " म्हणून संबोधिलेली.) ;

ज्याअर्थी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम ३१ चे पोट-कलम (१) अन्वये शासनाने बृहन्मुंबईचे प्रारूप विकास योजनांना (यापुढे "उक्त विकास योजना २०३४ " म्हणून संबोधलेले आहे.) शासन अधिसूचना क्रमांक टीपीबी/४३१७/६२९/प्र.क्र.११८/२०१७/ वि.यो./नवि-११, दिनांक ८ मे, २०१८ अन्वये सदर अधिसूचनेसोबत परिशिष्ट 'ब' मध्ये नमूद केलेले मंजुरीतून वगळलेले साराभूत स्वरुपाचे फेरबदल (ई.पी) वगळून अधिसूचनेसोबत परिशिष्ट 'अ' मध्ये दर्शविलेल्या सुधारणेसह मंजूरी दिली आहे ;

ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी (यापुढे "उक्त संपादन संस्था" म्हणून संबोधिलेले) उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ (१) अन्वये उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करण्याबाबत समुचित शासनाकडे अर्ज केला आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १५१ पोट-कलम (१) खाली काढलेल्या शासन निर्णय क्रमांक टीपीएस २१७५-५२०६/नवि-७, दिनांक ३ मार्च १९७९ अन्वये मंजूर विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी निर्दिष्ठीत करण्यात आलेल्या जमिनीबाबतच्या उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६(१), (२) व (४) खालील भूमीसंपादनाबाबत करावयाच्या शासनाच्या शक्ती जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत ;

ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या संपादनापोटी द्यावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम संपूर्णपणे उक्त संपादन संस्था यांनी अदा करावयाची आहे ;

ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना (दुसरी दुरुस्ती) अध्यादेश, २०१५ **शासन राजपत्रात** दिनांक २९ ऑगस्ट, २०१५ मध्ये नमूद नुसार प्रादेशिक आराखडा, विकास आराखडा किंवा नगर रचना योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक, आरक्षित अथवा निश्चित केलेल्या जमिनीसाठी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापुढे " उक्त संपादन अधिनियम २०१३ " म्हणून संबोधिलेला) मधील कलम ४ ते १५ मधील नमूद कार्यपद्धती लागू ठरणार नाही ;

ज्याअर्थी, उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रस्तावासाठी आवश्यक असल्याबाबतची उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. ७ मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा यांची खात्री झाली आहे;

त्याअर्थी, शासनाने प्रदान केलेल्या शक्तीनुसार आणि उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ च्या पोट-कलम (२) व (४) सह उक्त भूसंपादन अधिनियम, २०१३ च्या कलम १९ च्या पोट-कलम (१) अन्वये उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. ७ मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा, असे घोषित करतात की, उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत आणि उक्त भूसंपादन अधिनियम, २०१३ च्या कलम 3 खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. ७, मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा, प्रतापगड को.ऑ.हौ.सो., विनायक अपार्टमेंट, १मजला, हाफकिन इन्स्टिट्यूटसमोर, परेल व्हिलेज, मुंबई-१२ यांना पदनिर्देशित केले आहे.

अनुसूची- एक

संपादन करावयाच्या जमिनीचे वर्णन

मौजे ई-वॉर्ड, बांद्रा (पश्चिम), तालुका अंधेरी, जिल्हा मुंबई उपनगर

अ.क्र.	न.भू.क्र.	आवश्यक जमिनीचे क्षेत्र (चौ.मी.)
१	६२७	३०.८८
२	६२५	३९.२०
३	८७२ ब	३६.००
४	८७२/अ/१	२०३.४०
५	५७७	१०२.९०
६	५७२/अ	५.२१
७	५७८	२.२५
८	५८४	३.८०
	एकूण	**४२३.६४**

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाचे विवरण

प्रकल्पाचे नाव	" मुंबई मेट्रो प्रकल्प-२ब या प्रकल्पातील सारस्वत स्थानकात जा-ये करणेकरिता "
प्रकल्पाचे वर्णन	" मुंबई मेट्रो प्रकल्प-२ब या प्रकल्पातील सारस्वत स्थानकात जा-ये करणेकरिता "
समाजाला मिळणारे लाभ	सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध होणार आहे.

अनुसूची - तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

निरंक

अनुसूची - चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

निरंक

उक्त जमिनीचे नकाशे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. ७, मुंबई व मुंबई उपनगर, प्रतापगड को.ऑ. हौ. सो., विनायक अपार्टमेंट, १ मजला, हाफकिन इन्स्टिट्यूटसमोर, परेल व्हिलेज, मुंबई -१२ या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळात निरीक्षणासाठी उपलब्ध आहेत.

ठिकाण : परेल, मुंबई,
दिनांक ११ मार्च २०२६.

रविंद्र बोंबले,
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. ७,
मुंबई व मुंबई उपनगर.

BY THE DY. COLLECTOR (LAND ACQUISITION) No. 7, MUMBAI & MUMBAI SUBURBAN DISTRICT

Pratapgarh Co. Op. Ho. Soc., Vinayak Apartment, Opp. Haffkine Institute,
1st Floor, Parel Village, Mumbai 400 012.

NOTIFICATION

No.DCLA-7/LA/M.S.D./LAQ-863/2024.—Whereas, Development Plan 2034 of Greater Mumbai Municipal Corporation (hereinafter referred to as "the said Development Plan 2034") of Urban Development Department of Government of Maharashtra under, Notification No. TP.R/4317/629/CR-118/2017/ DP/UD-11 dated 8th May 2018 has been Published in *Maharashtra Government Gazette* Part One- Kokan Divisional Supplement, dated Thursday to Wednesday, May, 17-23, 2018 sanctioned under sub-section (*1*) of section 31 of Maharashtra Regional and Town Planning Act 1966 (hereinafter referred to as " the said Maharashtra Act "), and come into force with effect from date of Notification;

Whereas the land specified in the *Schedule-1* appended hereto (hereinafter referred to as "Said Lands") Rule No. 55 of the Development Plan 2034, "Any alignment modifications introduced in Metro/Mono/Coastal Road/ Elevated Corridors / Corridors of Mass Rapid Transport System, including BRTS, by the Appropriate Authority and sanction by Government shall stand automatically amended on the Development Plan as modified." are affected by the site reserved for the purpose of "Mumbai Metro Project-2B, for commuting 'to and from' to Saraswat station" (hereinafter referred to as the said "Public Purpose" in the said Revised Development Plan;

Whereas, Government in Urban Development Department under Notification No TPB/4317/629/ CR118/2017/DP/UD-11, dated 8th May, 2018 issued under sub-section (*1*) of section 31 of the said Maharashtra Act has approved sanction to Draft Development Plan, 2034 (hereinafter referred as Development Plan, 2034) with modifications shown in *Schedule 'A'* appended notification excluding the substantial modification as shown in *Schedule 'B'* appended to the notification;

Whereas, Mumbai Metropolitan Region Development Authority (hereinafter referred to as " the said Acquiring Body ") has made an application to the Appropriate Government/ Collector, Mumbai Suburban District under sub-section (*1*) of section 126 of the said Maharashtra Act for acquiring the said land for the said Public purpose ;

Whereas, under Government Resolution, Urban Development Department No.TPB/2175-5206/ UD-11 dated 3rd March 1979 issued under sub-section (*1*) of section 151 of the said Maharashtra Act, the powers exercisable by the State Government in respect of sub sections (*1*), (*2*) and (*4*) of section 126 of the said Maharashtra Act relating to the acquisition of the land for public purpose specified in the sanctioned Development Plan, have been delegated to the Collector, Mumbai Suburban District ;

Whereas, the compensation is to be awarded against the acquisition of the said land is to be paid wholly by the said Acquiring Body ;

Whereas, the Government in Urban Development Department under, Maharashtra Regional and Town Planning (Second Amendment) Ordinance, 2015, published in *Government Gazette* dated 29th August 2015 mentioned that the procedure specified in sections *4* to *15* of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (hereinafter referred to as the "said Acquisition Act, 2013") shall not be applicable in respect of any land required, reserved or designated in a Regional Plan, Development Plan or Town Planning Scheme for public purpose ;

And whereas, the Deputy Collector (Land Acquisition) No.7, Mumbai and Mumbai Suburban District, is satisfied that the said land is needed for the said Public Purpose.

Therefore, in exercise of the delegated powers and under sub-section (*2*) and (*4*) of section 126 of the said Maharashtra Act read with sub-section (*1*) of section 19 of the said Land Acquisition Act, 2013 the Dy. Collector (Land Acquisition) No. 7, Mumbai & Mumbai Suburban District, hereby declares that the said land is needed for the said public purpose and under clause (*g*) of section 3 of the said Acquisition Act, 2013, the Collector, being the appropriate Government, is pleased to designate Dy. Collector (Land Acquisition) No. 7, Mumbai and Mumbai Suburban District, Pratapgarh Co. Op. Ho. Soc., Vinayak Apartment, Opp. Haffkine Institute, 1st Floor, Parel Village, Mumbai 400 012 to perform the functions of a Collector under the said Act.

Schedule -1

Description of the Land to be Acquired

Village Bandra (West)-E ward, Taluka Andheri, Dist Mumbai Suburban

Sr. No.	C.T.S. No.	Area of Required Land (Sq.Mtr.)
1	627	30.88
2	625	39.20
3	872/B	36.00
4	872/A/1	203.40
5	577	102.90
6	572/A	5.21
7	578	2.25
8	584	3.80
	Total	**423.64**

S*chedule*-2

Statement of the nature of Public Purpose

Name of project	" Mumbai Metro Project -2B, For commuting ' to and from' to Saraswat Station"
Description of project work	" Mumbai Metro Project -2B, For commuting ' to and from' to Saraswat Station"
Benefits of the society	Public Tranport facility will be available

Schedule-3

Description of resettlement area.

Nil

Schedule-4

Summary of Rehabilitation and Rehabilitation Scheme

Nil

The plan of the said land can be inspected during office hours on any working day at the office of the Dy. Collector (Land Acquisition) No. 7, Mumbai and Mumbai Suburban District, Pratapgarh Co. Ho. Soc., Vinayak Apartment, Opp. Haffkine Institute, 1st Floor, Parel Village, Mumbai 400 012

RAVINDRA BOMBLE,
Deputy Collector (Land Acquisition) No.7,
Mumbai and Mumbai Suburban.

Place- Parel, Mumbai,
dated 11th March, 2026.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.